PDF Compressor Free Version

(133)

शासन ज्ञापन, क्रमांक-एलआरएफ-२६०७/९६६/प्र.क्र. २५१/ज-३

महसूल व वन विभाग,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक :- १२ नोव्हेंबर, २००९

**विषय- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा**

मौजे घाटकोपर, ता. कुर्ला, स. नं. २३६ अ, नभूक्र १९४ अ मधील १६४० चौ. मी. जमीन श्रीमती विद्या बसवराज आडके यांच्या "श्री. व्यंकटेश आर्टस एज्युकेशन आणि वेल्फेअर सोसायटी" या संस्थेस "शैक्षणिक, सामजिक व सांस्कृतिक" प्रयोजनासाठी मंजूर करणे बाबत...

**शासन ज्ञापन :-**

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना त्यांचे पत्र क्रमांक मशा/कार्या-२/जमीन-३/ कावि-९४४/२००७, दिनांक ८ मे, २००८ व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्रमांक-सी/कार्या-२ एफ/एलएनडी/कावि-३३२/२००७, दिनांक २४/१०/२००७ ला अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्यात येते की, मौजे घाटकोपर, ता. कुर्ला, स. नं. २३६ अ, नभूक्र १९४ अ मधील १६४० चौ. मी. जमीन श्रीमती विद्या बसवराज आडके यांच्या "श्री. व्यंकटेश आर्टस एज्युकेशन आणि वेल्फेअर सोसायटी" या संस्थेस "शैक्षणिक, सामजिक व सांस्कृतिक" प्रयोजनाकरीता (विविध उपक्रमाव्दारे, स्पर्धाव्दारे सामाजिक विकास करणे, पूर्व प्राथमिक बाल संस्कार स्थापन करणे, व्यायाम शाळा चालविणे इत्यादी) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक- एलआरएफ - १०८३ / ७११३४ / प्र.क्र. ३४७८/ग-६, दिनांक ८/२/१९८३ व क्रमांक - एलआरएफ - १०८३ / १४९६ / प्र.क्र. ३७००/ग-६, दिनांक ११/५/१९८४ मधील तरतुदी/अटी/ शर्तीची पुर्तता करण्याच्या अटीवर त्या जमिनीच्या सन १९७६ च्या दराच्या २५% इतकी रक्कम आकारून संस्थेस सदर जमीन कब्जेहक्काने मंजूर करण्यास, खालीलप्रमाणे अतिरिक्त अटी/शर्तीवर तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून घालण्यात येणा-या इतर अटी/शर्तीवर शासन मान्यता देण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

PDF Compressor Free Version



**अटी :-** १) "विषयांकित जमीन ही निवासी भागात समाविष्ट असून सदर जमिनीवर विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील नियम क्रमांक ५१ नुसार आर-१ विभागातील वापर अनुज्ञेय होऊ शकेल. त्यानुसार अनुज्ञेय प्रयोजनाची बांधकामे जागेवर करण्यात यावी तसेच सदर जागेवर मंजूर प्रयोजनाचे बांधकाम करतांना त्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेची मान्यता घेण्यात यावी.

२) सदर जागेवर शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रयोजने विकसित करतांना त्यास सक्षम प्राधिका-यांची मान्यता घ्यावी.

३) उक्त जागेवरुन टाटा पॉवर कंपनीची उच्च दाबा ची विद्युत वाहिनी गेलेली असून पूर्वेस नाला असल्याने या वस्तुस्थितीमुळे जमीन बाधित ठरत आहे. सबब त्याकरीता संबंधित प्राधिका-यांचे "ना हरकत" घेण्याची अट संस्थेवर बंधनकारक राहील.

४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक- एलआरएफ - १०८३ / ७११३४ / प्र.क्र. ३४७८/ग-६, दिनांक ८/२/१९८३ व क्रमांक - एलआरएफ - १०८३ / १४९६ / प्र.क्र. ३७००/ग-६, दिनांक ११/५/१९८४ मधील तरतुदी/अटी/शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

५) सदर जागा संस्थेस भोगवटादार वर्ग-२ म्हणून प्रदान करण्यात येत असून सदर भूखंड ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आला आहे, त्याच प्रयोजनासाठी भूखंडाचा वापर करण्यात यावा. अन्य कोणताही वापर शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय अनुज्ञेय होणार नाही.

६) सदर भूखंड शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय विक्री/हस्तांतर किंवा भाडेपट्टयाने देता येणार नाही. तसेच सक्षम प्राधिका-याच्या मंजूरीशिवाय गहाण ठेवता येणार नाही.

७) जागेवरील प्रस्तावित शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रयोजनाचे बांधकाम भूखंडाचा ताबा मिळाल्यापासून २ वर्षाच्या मुदतीत करणे आवश्यक राहील.

८) यासंदर्भात जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर हे देतील अशा अटी/शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

Scanned by CamScanner

PDF Compressor Free Version



९) संस्थेस वरीलपैकी तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून घालण्यात येणा-या इतर कोणत्याही अटी/शर्तींचा भंग केल्यास सदर भूखंड त्यावरील बांधकामासह विनाअट शासन जमा करण्यात येईल.

२. सदरचे आदेश नगर विकास विभागाच्या सहमतीने त्यांचेकडील अनौपचारीक संदर्भ क्रमांक-२९८/युओआर/०७/नवि-११, दिनांक १८/१/२००८ च्या अनुषंगाने तसेच शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचेकडील अनौपचारीक संदर्भ क्रमांक १२३४/व्यय-९ दिनांक २/९/२००९ च्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( राजेंद्र सुर्वे )

उप सचिव

महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,

मुंबई उपनगर जिल्हा

प्रशासकीय इमारत,

बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१

प्रतिलिपी :-

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

२) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, पुणे

३) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई

४) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, मुंबई उपनगर जिल्हा.

५) महालेखापाल, १/२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर

६) महालेखपाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर

७) नगर विकास विभाग, नवि-११, मंत्रालय, मुंबई

८) वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.

९) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग/माशि-३, मंत्रालय, मुंबई

१०) ट्रस्टी, श्री व्यंकटेश आर्टस एज्युकेशन आणि वेल्फेअर सोसायटी, १००२/ए, शिवनेरी को.ऑप.सोसायटी, बॅ. नाथ पै. नगर घाटकोपर, पूर्व, मुंबई-७७

११) ज-३ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned by CamScanner

PDF Compressor Free Version


# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

Ph.6556799, 6550111 Fax : 6556805 email address:- collrmsd@yahoo.com


१७१

क्र. :- सी/कार्या-२डी/जमिन/कावि-२१९/०९
दिनांक :- १९/११/२००९

वाचले :- १) शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील ज्ञापन क्र. एलआरएफ-२६०७/९६६/प्र.क्र.२५१/ज-३ दि. १२/११/२००९.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. सी/कार्या-२डी/जमिन/कावि-२१८/०९ दि. १७/११/२००९.

आदेश :-

मौजे घाटकोपर, ता. कुर्ला, स.नं. २३६ अ, न.भू.क्र. १९४ अ मधील १६४०चौ.मी. जमिन श्री व्यंकटेश आर्टस एज्युकेशन आणि वेल्फेअर सोसायटी या संस्थेस शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रयोजनाकरीता (विविध उपक्रमाद्वारे, स्पर्धाद्वारे, सामाजिक विकास करणे, पूर्व प्राथमिक बाल संस्कार स्थापन करणे, व्यायाम शाळा चालविणे इत्यादी) शासन, निर्णय महसूल व वन विभाग क्र. एलआरएफ-१०८३/७११३४/प्र.क्र.३४७८/ग-६ दि. ०८/०२/१९८३ व क्र. एलआरएफ-१०८३/१४९६/प्र.क्र. ३७००/ग-६ दि. ११/०५/१९८४ मधील तरतूदी अटी/ शर्तीची पूर्तता करण्याच्या अटीवर त्या जमिनीच्या सन १९७६ च्या दराच्या २५% इतकी रक्कम आकारुन संस्थेस सदर जमिन कब्जेहक्काने मंजूर करण्यास शासनाने वरील उद्देशिकेतील अ.क्र .१ कडील दि. १२/११/२००९ चे ज्ञापनान्वये मान्यता दिलेली आहे.

अध्यक्ष, श्री व्यंकटेश आर्टस एज्युकेशन आणि वेल्फेअर सोसायटी यांनी सदर जमिनीच्या सन १९७६ च्या बाजारभावाची तात्पुरती किंमत प्रति चौ.मी. रुपये ८१५/- प्रमाणे क्षेत्र १६४० चौ.मी. साठी एकूण किंमतीच्या २५% इतकी सवलतीची कब्जेहक्काची रक्कम रुपये ३,३४,१५०/- (तीन लक्ष चौतीस हजार एकशे पन्नास मात्र) दि. १७/११/२००९ च्या पे ऑर्डरने या कार्यालयात भरणा केलेली आहे. तसेच सदर जमिनीचे सहाय्यक संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागाने अंतिम मूल्यांकन केल्यानंतर येणारे अंतिम मुल्यांकन व तात्पुरत्या मुल्यांकनामधील फरकाची रक्कम प्रचलित दराने व्याजासह भरण्यास तयार असल्याबाबतचे हमीपत्र दि. १८/११/२००९ रोजी सादर केले आहे.

श्री व्यंकटेश आर्टस एज्युकेशन आणि वेल्फेअर सोसायटीस क्षेत्र १६४० चौ.मी. जमिन खालील अटी/ शर्तीवर मंजूर करण्यात येत आहे.

अटी/ शर्ती :-

१) विषयांकित जमिन ही निवासी भागात समाविष्ट असून सदर जमिनीवर विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील नियम क्र. ५१ नुसार आर-१ विभागातील वापर अनुज्ञेय होऊ शकेल. त्यानुसार अनुज्ञेय प्रयोजनाची



Scanned by CamScanner

PDF Compressor Free Version

बांधकामे जागेवर करण्यात यावी तसेच सदर जागेवर मंजूर प्रयोजनाचे बांधकाम करताना त्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेची मान्यता घेण्यात यावी.

२) सदर जागेवर शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रयोजने विकसित करताना त्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घ्यावी.

३) उक्त जागेवरुन टाटा पॉवर कंपनीची उच्च दाबाची विद्युतवाहिनी गेलेली असून पूर्वेस नाला असल्याने या वस्तुस्थितीमुळे जमिन बाधीत ठरत आहे. सबब त्याकरीता संबंधीत प्राधिकाऱ्यांचे ना हरकत घेण्याची अट संस्थेवर बंधनकारक राहील.

४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एलआरएफ-१०८३/७११३४/प्र.क्र.३४७८/ग-६ दि. ०८/०२/१९८३ व क्र. एलआरएफ-१०८३/१४९६/प्र.क्र.३७००/ग-६ दि. ११/०५/१९८४ मधील तरतूदी अटी/ शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

५) सदर जागा संस्थेस भोगवटादार वर्ग-२ म्हणून प्रदान करण्यात येत असून सदर भूखंड ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आला आहे, त्याच प्रयोजनासाठी भूखंडाचा वापर करण्यात यावा. अन्य कोणताही वापर शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय अनुज्ञेय होणार नाही.

६) सदर भूखंड शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय विक्री/ हस्तांतर किंवा भाडेपट्ट्याने देता येणार नाही, तसेच सक्षम प्राधिका-याच्या मंजूरीशिवाय गहाण ठेवता येणार नाही.

७) जागेवरील प्रस्तावित शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रयोजनाचे बांधकाम भूखंडाचा ताबा मिळाल्यापासून दोन वर्षाच्या मुदतीत करणे आवश्यक राहील.

८) संस्थेस वरीलपैकी कोणत्याही अटी/ शर्तीचा भंग केल्यास सदर भूखंड त्यावरील बांधकामासह विनाअट शासन जमा करण्यात येईल.

- सही -
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

COLLECTOR (जिल्हाधिकारी) मुंबई उपनगर MUMBAI SUBURBAN

प्रति,
अध्यक्ष,
श्रीमती विद्या बसवराज आडके
श्री व्यंकटेश आर्टस एज्युकेशन आणि वेल्फेअर सोसायटी,
८०१, बी विंग, शिवनेरी सह . गृहनिर्माण संस्था,
बॅ. नाथ पै नगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई-७७

प्रत:

१) मा. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय यांना माहितीसाठी सविनय सादर.

2dkavi228-mrs

Scanned by CamScanner

PDF Compressor Free Version

[illegible]

[illegible]

COLLECTOR OF
MUMBAI SUBURBAN DISTRICT

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरिता

नगर भूमापन अधिकारी
[illegible]

2dkavi228-mrs



Scanned by CamScanner